MHGA070003912023

| | |
|---|---|
| दाखल दिनांकः | ०९.०६.२०२३ |
| नोंदणी दिनांकः | ०९.०६.२०२३ |
| निकाल दिनांकः | ०६.०५.२०२६ |
| कालावधीः | ०२ व. १० म. २७ दि. |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

| | |
|---|---|
| | **निशाणी – ३४** |
| **अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी, यांच्या न्यायालयात,<br>पिठासिन अधिकारी : एस.एम.एच.शाहिद,** | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. **११/२०२२**, कसनसुर पोलीस ठाणे. |
| न्यायनिर्णयाची तारीख | **०६.०५.२०२६** |
| प्रकरण क्रमांक | **नियमीत फौजदारी खटला क्रमांक ३७/२०२३** |
| तक्रारकर्ता / अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन**,<br>मार्फत/पोलीस स्टेशन अधिकारी, कसनसुर, |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. आर.एस. उंदिरवाडे,**<br>(सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता) |
| आरोपी | **पंकज अरविंद गेडाम,**<br>वय १९ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,<br>राहणार – गांधीनगर, ता. चामोर्शी,<br>जिल्हा गडचिरोली. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्रीमती जैनवार**<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग ब***

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १६.०८.२०२२ |

* दि. १४.०७.२०२२ रोजी प्रकाशित राजपत्र क्र. ०८०१/२०२२ नुसारच्या नमुन्यात.

| | |
|---|---|
| पहिल्या खबरीची तारीख | १६.०८.२०२२ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | ०९.०६.२०२३ |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | २३.०८.२०२३ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | २३.०९.२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ०६.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०६.०५.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | -- |

## आरोपींबाबत तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिद्ध की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पंकज अरविंद गेडाम | – | ०९.०६.२०२३ | भारतीय दंड विधान १८६० च्या कलम ३६३ अन्वये | **निर्दोष** | – | – |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| भारतीय दंड विधान, १८६० | **दंड विधान** |
| भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ | **पुरावा अधिनियम** |

**भाग क**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्ष:**

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| सा.क्र. १ | वैष्णवी विलास मडावी (**निशाणी १९**) | फिर्यादी |
| सा.क्र. २ | विलास लक्ष्मण मडावी (**निशाणी २०**) | पिडीता |
| सा.क्र. ३ | साधु गनु कोरामी (**निशाणी २४**) | पंच साक्षदार |
| सा.क्र. ४ | रजनी विलास मडावी (**निशाणी २७**) | साक्षदार |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबद्ध दस्तांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u>:**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी **पी–२१**/स.सा.क्र.०२ | तोंडी रिपोर्ट वरिल सहीला |
| २. | निशाणी **पी–२२**/स.सा.क्र.०२ | छापिल नमुन्यातील खबर वरिल सहीला |

**ड. महत्त्वाच्या वस्तु:**

| अ.क्र. | महत्त्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| .. | .. | .. |

**न्यायनिर्णय**

(निकाल दिनांक : ०६ मे २०२६)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३६३ प्रमाणे खटला चालवण्यात आला.

२. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, दि.१६/०८/२०२२ रोजी सायंकाळी ते घरातील सर्व झोपले असतांना पिडीता वैष्णवीसोबत रात्री टि.व्ही. पाहत होते. नंतर टि.व्ही. बंद करुन त्यांची पत्नीने वैष्णवीस झोपण्यास सांगितले. दि. १७/०८/२०२२ रोजी ते सकाळी ०६.०० वा. च्या सुमारास उठले तेव्हा पिडीता वैष्णवी खोलीत मिळून आली नाही. त्यांनी सर्वांनी मिळून आजुबाजुला शोध घेतला, गावात व आसपासच्या परीसरात शोध घेतला परंतु वैष्णवी कोठेही मिळून आली नाही. गावातील लोकांना व वैष्णवीच्या मैत्रीनीकडेही वेष्णवीबद्दल विचारपुस केली परंतु वैष्णवीचा शोध लागला नाही. तसेच नातेवाईकांकडे फोनद्वारे वैष्णवी बद्दल विचारपुस केली. परंतु नातेवाईकांकडेही तिचा पत्ता मिळून आला नाही. दि.१७/०८/२०२२ रोजी सुद्धा त्यांनी सर्वांनी मिळून

आसपासचे गावात व नातेवाईकांकडे वैष्णवीचा शोध घेतला परंतु तो मिळून आली नाही. पिडीता हिला यापुर्वी आरोपी पंकज गेडामने फूस लावून चोखेवाडा येथे पळवून आणले होते. पिडीता वैष्णवी हिला पंकज गेडाम या व्यक्तीने फुस लावुन पळवून नेले असल्याचा त्यांचा दाट संशय आहे. तरी त्याचे विरुद्ध कायदेशीर कार्यवाही होणेकरीता त्यांनी तोंडी रिपोर्ट दिली.

३. पोलीस ठाणे अंमलदाराने सदर तक्रारीवरुन अपराध क्र. ११/२०२२ उपरोक्त कलमान्वये आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला. त्यानंतर त्यांनी फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब नोंदवले. आरोपीला अटक करुन तसा अटक पंचनामा तयार केला. त्यांनी पुरावा गोळा करुन सविस्तर अहवाल तयार करुन तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. मी दि.२३.०८.२०२३ रोजी आरोपीविरुध्द नि.क्र.१४ वर दोष निश्चित केले. त्यातील मजकूर आरोपीला वाचून व समजावून सांगितला. त्यानी गुन्हा कबूल न करता न्याय चौकशी सामोरे जाणे पसंत केले. त्यांच्याविरुध्द पुरावा नसल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये नोंदवण्यात आले नाही.

५. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होण्याकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याकरिताचे माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक १६.०८.२०२२ ते १७.०८.२०२२ रोजी, सांयकाळी २१:३० ते ०६.०० वाजता, मौजा घोटसुर, तह. एटापल्ली येथे आरोपीने फिर्यादी विलास लक्ष्मण मडावी याच्या मुलीचे तिच्या कायदेशीर पालकत्वातून, त्यांच्या संमतीशिवाय अपहरण केले व त्याद्वारे तुम्ही शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यांत आली. |

## <u>कारणमिमांसा</u>

६. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करणेकामी एकूण चार साक्षीदाराची साक्ष नोंदवली.

<u>**मुद्दा क्र.१ करिताः**</u>

७. सदर मुद्दे एकमेकाशी निगडीत असल्याने ते मी एकत्रीतरित्या निर्धारणासाठी घेतले आहे. दिनांक १६.०८.२०२२ ते १७.०८.२०२२ रोजी, सांयकाळी २१:३० ते ०६.०० वाजता, मौजा घोटसुर, तह. एटापल्ली येथे आरोपीने फिर्यादी विलास लक्ष्मण मडावी याच्या मुलीचे तिच्या कायदेशीर पालकत्वातून,त्यांच्या संमतीशिवाय अपहरण केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द करणे आवश्यक आहे.

८. फिर्यादी साक्षीदार **सा.क्र.२ विलास मडावी**, याच्या सरतपासात असे कथन केले की, ती आरोपीला ओळखते. वैष्णवी त्याची मुलगी आहे. घटनेला अंदाजे दोन ते तिन वर्षापुवी घउली .त्याची मुलगी चातगांव येथे राहत होती. त्याच्या सासुन त्याला सांगीतले की, वैष्णवी घरी आली नाही त्यानंतर तिचा शोध घेतला परंतु ती मिळाली नाही. म्हणुन पोलीस स्टेशनला रिपोर्ट नि.क्र.२१ दिली व प्रथम खबर अहवाल नि.क्र.२२ दिली. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात कबुल केले की, तिची मुलीगी आरोपीसोबत गेली होती. त्यांची व आरोपीची न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. त्यामुळे त्यांना प्रकरण चालवायचे नाही. आरोपीतर्फे वकीलांनी उलटतपासात घटनेच्या वेळी ते घोटसुर येथे राहत होते व त्याची मुलगी शिक्षणाकरिता आजीकडे राहत होती. त्यावेळी ती ११ वीत शिकत होती. तिचे वय १८ वर्षे पुर्ण झाले होते. ते घोटसुर येथे राहत होते. ईतर सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

९. पंच **सा.क्र.३ साधु कोरामी** यांनी त्यांच्या सरतपासात त्यांनी सुचनापत्र, घटनास्थळ पंचनामा/गुन्हयाचा तपशिल नमुन्यावरिल मजकुर नाकारला. उलटतपासात त्यांनी संपुर्ण प्रंश्नाना नकारार्थी उत्तरे दिली.

१०. **सा.क्र.१ वैष्णवी मडावी (पिडीता)** यांनी त्यांच्या सरतपासात सांगीतले की, तिला आईबाबाचा राग होता म्हणुन ती आरोपीला कॉल केला. आरोपी गांधीनगर चामोर्शीचा रहिवासी आहे. त्याच्यासोबत तिचे प्रेमसंबंध होते. परंतु तिचे आईवडीलांनी नकार दिला त्यामुळे तिने आरोपीला फोन करून बोलाविले व तो आला. त्यानंतरती आोपीसोबत बाहेर गेली. त्यानंतर तिचे आई वडीलांनी पोलीस स्टेशनला तक्रार दिली. त्यानंतर ती आईवडीलांकडें परत आली. पोलीसांनी तिची विचारपुस केली होती. आरोपीतर्फे घेण्यात आलेलया उलटतपासा तिने मान्य केले की, ती तिच्या आजीकडे चातगाव येथे शिकत होती. घटनेवेळी ती ११ वीत होती. आरोपी पंकज आणि ती एकाच समाजाचे असल्याने नातेवाईक असल्याचे सांगीतले. जेव्हा ती ११वी होती तेवहा तिचे वय १८ वर्षे पुर्ण झाले होते. तिला तिचे आईबाबा बाहेर जावू देत नव्हते त्यामुळे तिने आरोपीला फोन करून तिला बाहेर घेवूण जाण्यास विनंती केली. तिचे आईवडीलांनी तिचे वय बरोबर माहित नसल्याची तक्रार देता ती १७ वर्षाची असल्याचे सांगीतले. ती आरोपी पंकजसोबत स्वमजीने गेली असल्याचे सांगीतले.

१०. **सा.क्र.४ रजनी मडावी (पिडीताची आई)** यांनी त्यांच्या सरतपासात सांगीतले की, पिडीता तिची मुलगी आहे. घटनेला दोन ते तिन वर्ष झाले. आरोपी तिच्या मुलीला पळवुन नेले होते.

११. सहा.सरकारी अभियोक्ता आणि आरोपीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच प्रकरण व त्यामध्ये दाखल सर्व दस्ताऐवजांचे अवलोकन केले.

१२. अभिलेखावरील साक्षीदाराचे पुराव्याचे अवलोकन केले. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फक्त चार साक्षीदार तपासले. फिर्यादीने व पिडीताने आरोपीविरूध्द काही सांगितले नाही. स़ाक्षीदार क्र.३ पंच आहे परंतु ते फितुर झालेत. सा.क्र.४ हा ऐकीव साक्षीदार आहे. तसेच सदर प्रकरणात तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदविण्यात आली नाही. अभिलेखावर आरोपीविरुध्द पुरावा आणण्याची जबाबदारी अभियोगपक्षाची आहे, परंतु सदर प्रकरणात फिर्यादीने व पिडीतेने आरोपीविरूध्द पुराव्यात काही नाही सांगितल्याने आणि तपासी अधिकारी यांची साक्ष न घेतल्यामुळे अभियोगपक्ष अभिलेखावर पुरावा आणण्यास असमर्थ ठरले आहे. एकंदरीत वर चर्चा केल्याप्रमाणे सर्व बाबींचा विचार करता आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरला असे माझे मत आहे. परिणामतः पुराव्याअभावी, मी मुददा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.२ करिताः**

१३. उपरोक्त चर्चेनुसार मुद्दे क्र.१ चे कारणमिमांसेवरुन अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सबळ पुराव्याअभावी सिध्द केला नसल्याने, आरोपीला सदर खटल्यातुन निर्दोष मुक्त करणेचे निष्कर्षाप्रत मी आलो आहे. सदर प्रकरणात फिर्यादी फितुर झाल्याने माननीय मुंबई उच्च न्यायालयाने **रंजना शांतीलाल सुर्यवंशी वि. जयप्रकाश तुळशीराम गुप्ता**[1] मध्ये दिलेल्या निर्देशाची अनुपालन करण्याची आवश्यकता नाही. म्हणुन, मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ मी खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. आरोपी **पंकज अरविंद गेडाम,** याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भा.दं.वि.चे कलम ३६३ नुसार दंडनिय अपराधातुन निर्दोष ठरवून मुक्त करण्यात येते.
२. आरोपीचे जामीनपत्र रद्द करुन जामीनदाराला मुक्त करण्यांत येते.

1 फौजदार अर्ज क्र.३८०/२०१९ मध्ये दि.१६.०७.२०२० चे आदेशाप्रमाणे

३. आरोपीने फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अंतर्गत वरिष्ठ न्यायालयात अपिल करिता हजर राहण्याकामी रूपये ४५,०००/– चा जामीन दाखल कराव

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.05.06 18:31:30 +0530

(**एस.एम.एच.शाहिद**)

दि.०६.०५.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहेरी